# कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २८७ /२०२५ दि. ०४/११/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत MMRDA तर्फे ॲफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनी कडून मेट्रो करीता पिलर उभारण्यात आलेले आहेत. त्यापैकी नळपाडा सिग्नल जवळ उभारण्याात आलेल्या मेट्रोचे पिलर क्र. १२, १३ वर क्रेनचे सहाय्याने सिमेंट आय गर्डर टाकण्याचे नियोजित आहे. मेट्रो पिलरवर गर्डर बसविण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या क्रेन नळपाडा सिग्नल जवळ रस्त्यावर उभ्या करण्यात येणार आहेत. त्यामुळे सदर मार्गावरून जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद ठेवावी लागणार असून सदर मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवावी लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** घोडबंदर ठाणे वाहिनी स्लीप रोडवरुन कापुरबावडी सर्कल मार्गे ठाणे, भिवंडी तसेच नाशिकचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ब्रॉडवे पेट्रोल पंप** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही घोडबंदर ठाणे वाहीनी माजिवाडा ब्रिज वरुन पुढे वरुन सरळ जावुन इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** कोलशेत रोडने ढोकाळी नाक्या कडुन कापुरबावडी सर्कल मार्गे ठाणेचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नंदिबाबा मंदिर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही नंदिबाबा मंदिर चौक येथुन डावीकडे वळण घेवुन प्रभाग समिती समोरील चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** ठाणे कडुन नळपाडा सिग्नल येथुन उजवीकडे वळण घेवुन डी मार्ट, नंदिबाबा चौक मार्गे कोलशेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कापुरबावडी जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही कापुरबावडी जंक्शन येथुन उजवीकडे वळण घेवुन प्रभाग समिती सिग्नल येथुन इच्छित स्थळी जातील. |

**१) दि. ०४/११/२०२५ रोजी रात्रौ २३:३० ते दि. ०५/११/२०२५ रोजी सकाळी ०५:३० वाजेपावेतो**

**२) दि. ०५/११/२०२५ रोजी रात्रौ २३:३० ते दि. ०६/११/२०२५ रोजी सकाळी ०५:३० वाजेपावेतो**

सदर वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

<u>प्रत</u> :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उप विभाग

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.